प्रकरण २ रे

# गांधीजी व आंबेडकर यांचे व्यक्तिमत्व व दलित नाटक

## प्रकरण दुसरे

# गांधीजी व आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व आणि दलित नाटक

**प्रस्तावना :**

महत्त्वकांक्षी माणसे स्वत:चे व्यक्तिमत्त्व स्वत:च घडवितात. त्यात त्यांच्या अंगभूत गुणांचा वाटा असतो. त्याचबरोबर अंगी नसणाऱ्या व त्यांना उपयुक्त असणाऱ्या गुणांची सामर्थ्यांची निर्मिती त्यांना करावी लागते गांधी व आंबेडकर या नेत्यांमध्ये अशी जबर इच्छाशक्ती होती. लहानपणी गांधीजीवर नैतिक व धार्मिक संस्कार झाले त्यांची सद्विवेकबुद्धी लहानपणीच जागृत होण्याचे कार्य घडले. मध्ययुगीन सुधारणा आणि एकेश्वरवाद आणि युक्तीवाद याचा परिणाम झाला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व ज्या तत्वानी मिळून विकास पावले त्याच विकसित व्यक्तिमत्त्वातून त्यांच्या जीवनातील तत्वज्ञानही साकारले. त्यांच्या एकूण विचारांचा गाभा मानवतावाद आहे. असे आपणास दिसते. त्यांच्यात विद्रोह, बंडखोर वृत्ती दिसून येते. एकूणच त्यांचे व्यक्तिमत्त्व म्हणजे अन्याय विपरिताला विरोध करणारे, नाकारणारे, धिक्कारणारे होते ते तसे विद्रोही बनले व त्यांच्या जीवनानेच अन्यायाबद्दल मनामध्ये चीड निर्माण केली आणि त्यामुळे त्यांचे व्यक्तीमत्त्व हे बंडखोर, विद्रोही स्वरूपाचे बनलेले दिसते. डॉ. आंबेडकर मूक समाजाचे नायक बनले. उपेक्षित समाजाचे आपल्या समाज बांधवांचे ते उद्धारक, मार्गदर्शक बनले आणि पिढ्यान पिढ्या चालत आलेल्या अनिष्ठ रुढीविरुद्ध लढावयास संघर्ष करण्यास त्यांना जागे करण्याचे काम हे डॉ. आंबेडकरांनी केले.

गांधीजी व आंबेडकर या दोघांच्या स्वभावात, दृष्टीकोणात राजकीय आणि सामाजिक भूमिका भिन्न आहेत अशा या महामानवांचे व्यक्तिमत्त्व सविस्तर पुढीलप्रमाणे पाहता येईल.

### म. गांधीजींचे व्यक्तिमत्त्व :

गांधीजी हे एक युगप्रवर्तक नेते होते आणि असे युगपुरूष नेते कुणा महापुरूषांच्या छायेत वाढत नाहीत. ते आपले स्वत:चे व्यक्तिमत्त्व स्वत:च घडवितात आणि महान बनतात. भारतीय स्वातंत्र्य चळवळीच्या इतिहासाच्या चळवळीत जे अनेक लहानथोर नेते होऊन गेले त्या सर्वांच्या तुलनेने महात्मा गांधीजीचे व्यक्तिमत्त्व एक वेगळेच वैशिष्ट्यपूर्ण व लोकविलक्षण असे आहे.

गांधीजींच्या जीवनात हिंदू आणि ख्रिस्ती धर्म संकल्पना, पौरात्य आणि पाश्चिमात्य सांस्कृतिक परंपरा आणि मध्ययुगीन व आधुनिक नीतिमुल्ये एकवटलेली दिसून येतात. गांधीजी संसारी गृहस्थ होते तरी ते सन्यस्त वृत्तीने राहत. स्वत:ला सनातनी हिंदू म्हणून घेत आणि सामाजिक सुधारणांचा पुरस्कार करीत. जनतेला शासकीय अन्यायाविरुद्ध सामुदायिक लढ्याची हाक देत. आणि वैर न करता अहिंसक वृत्तीचा मार्ग स्वीकारत.

गांधीजी लहानपणी सर्वसामान्य मुलांप्रमाणेच होते. त्यांची बुद्धी मंद होती. याबद्दल आपल्या आत्मकथेत ते सांगतात, 'बालपण पोरबंदरातच गेले. कोठल्याशा शाळेत घातले होते असे आठवते. कसेबसे काही पाढे शिकलो होतो, एवढी आठवण आहे दुसरे काही एक आठवत नाही. त्यावरून मी अनुमान करतो की, माझी बुद्धी मंद असावी आणि स्मरणशक्ती आम्ही पोरे एक कडवे गात असू त्यातल्या कच्च्या पापडासारखी अढ्यावी''[१] महात्मा गांधीचा जन्म २ ऑक्टोबर १८६९ या दिवशी पोरबंदर येथे झाला. त्यांचे वडील करमचंद उर्फ कबा गांधी पोरबंदरचे दिवाण होते. गांधीजींचे बालपण सौराष्ट्रातील पोरबंदर व राजकोट या ठिकाणी गेले बालपणातच त्यांच्यावर हिंदू धर्मातील अध्यात्मवाद आणि जैन व वैष्णव भक्तिपंथातील भुतदया व नीतिमुल्ये याचे त्यांच्या मनावर दृढ संस्कार झाले होते. परंतु त्यामुळे कोणत्याही विशिष्ट पारंपरिक धर्माची चौकट त्यांनी पत्करली नाही. हिंदू-ख्रिस्ती धर्मग्रंथाचे त्यांनी पूर्ण वाचन केले आणि त्यातूनच हिंदू धर्माविषयी आवड निर्माण केली व त्यातील काही दोष काढून हिंदू धर्म सुधारता येतो असे मत निर्माण केले. त्यासाठी इतर वेगळा धर्म स्वीकारण्याची गरज नाही अशी त्यांची खात्री झाली व त्यांना प्रथम ख्रिस्ती धर्माविषयी जे आकर्षण वाटत होते ते कमी झाले.

गांधींनी दक्षिण आफ्रिकेत गेल्यानंतर तेथील भारतीयांना स्वत:च्या हक्कासाठी लढण्यात प्रवृत्त केले या चळवळीच्या निमित्ताने सामाजिक प्रश्नाबाबत त्यांचे चिंतन सुरू झाले. वैयक्तिक जीवनात जी मूल्ये त्यांनी श्रेष्ठ म्हणून स्वीकारली होती तीच सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रांना लागू करण्याचा त्यांनी प्रयत्न केला. त्यामधून त्यांचे स्वत:चे असे एक सर्वांगिण सामाजिक तत्त्वज्ञान विकास पावले.

गांधीनी आपल्या वैयक्तिक जीवनात संयमाचे व्रत कटाक्षाने पाळले. गांधींविषयी जवाहरलाल नेहरूंनी पुढीलप्रमाणे वर्णन केले आहे. 'त्यांचे स्मित आल्हाददायक होते त्यांचे हसणे लोकांना उल्हासित करणारे होते त्यांच्या सहवासात मनाची कवाडे आपोआप खुली होऊन जात. त्यांच्यामध्ये असणारा लहान बालकाचा निरागसपणा आपणाला ओढून घेई. जेव्हा ते आपल्या खोलीत प्रवेश करीत तेव्हा तेथे खुल्या हवेची झुळूक येऊन वातावरण प्रफुल्लीत झाल्याची जाणीव होई.'[२] आणि म्हणूनच गांधीजी सर्वांना प्रेमळ वाटत होते. त्यांच्या सहवासात येणाऱ्या लहानथोर कोणाही माणसांची त्यांनी कधी उपेक्षा केली नाही. भोवतालच्या माणसाच्या सुखदु:खाशी आशाआकांक्षाशी ते समरस होत. अंतर्मुखता, सावधपणा, जागरूकता हे गांधीच्या स्वभावांचे विशेष होत. त्यांच्या वागण्यातून आणि आयुष्यभर केलेल्या प्रयोगामधून त्यांच्या व्यक्तिमत्वाला आकार येत गेला असे आपणाला दिसते. लहानपणी झालेले कौटुंबिक संस्कार इंग्लंडमधील वास्तवात त्यांच्या विचारांना मिळालेली दिशा, दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांच्या चळवळीत त्यांना आलेले अनुभव त्यांच्यामधून त्यांच्या विचारांची घडण होत गेली आणि भारत स्वातंत्र्यासाठी त्या चळवळीमधून त्यांना एक परिणत स्वरूप प्राप्त झाले.

सत्यनिष्ठा, स्वाभिमान, व्यवहारकुशलता या गुणांचा वारसा गांधीना त्यांच्या रक्तातूनच मिळाला होता. सत्यावरील अविचल निष्ठा आणि त्यांच्यासाठी कितीही क्लेश सहन करण्याची तयारी हे गुण त्यांच्या अंगी दिसून येतात. गांधीजींच्या घरात भक्तीने पारायण होई. गीता व भागवत या ग्रंथाचेही येथे वारंवार वाचन चाले. रामनामाने सर्व दु:खाचा व पापाचा नाश होतो. अशाप्रकारचे गांधींच्या मनावर लहानपणापासूनच रामनामाचे गांधीच्या मनावर लहानपणापासूनच रामनामाचे महात्म्य बिंबले होते. आपल्या कल्पनेतील आदर्श समाज व्यवस्थेला त्यांनी रामराज्य हे नाव दिले होते.

लहानपणी वाचलेल्या ग्रंथालयामधून श्रावणाची पितृभक्ती व हरिश्चंद्राची सत्वनिष्ठा यांचाही त्याच्या मनावर प्रभाव पडला होता.

कबा गांधी यांच्याकडे जैन, मुसलमान, पारशी अशा निरनिराळ्या जातीचे विद्वान गृहस्त येत असत आणि त्यांच्यामध्ये धार्मिक चर्चा घडून येत असे पण लहानपणी त्यांच्या मनावर याचा परिणाम न होता. आईकडेच त्याचा ओढा जास्त असल्यामुळे वडीलांविषयी त्यांच्या मनात पूज्यभाव असुनही त्यांच्याऐवजी आईच्या व्रताचरणाचाच त्यांच्या मनावर खोल ठसा उमठलेला होता. गुजरात व कोठवाड या प्रदेशामध्ये जैन हा फार पूर्वीपासून एक लोकप्रिय धर्मग्रंथ होता. गांधीजी जैन धर्मातील निवृत्ती वादाला सामाजिक कृती प्रवणतेची जोड दिली. अहिंसा , सत्य अस्तेय, ब्रह्मश्चर्य, असंग्रह अस्वाद या जैन तीर्थकरांनी घालून दिलेल्या व्रतचरणाचा त्यांनी आपल्या सत्याग्रह साधनेत समावेश केला आहे. पाश्चात्य देशातील धर्मपंथ आणि तेथील तत्वचिंतकाचे व राजकीय विचार यांच्याशी ओळख झाल्यावर या पारंपरिक व्रतकल्पनेत व अहिंसा धर्मात गांधीनी नवा आशय ओतला.

सत्याची व्याप्ती खरे बोलण्यापूरती मर्यादित न ठेवता त्यांनी ती सामाजिक न्यायाच्या कल्पनेशी नेऊन भिडवली गांधीजी हे लहानपणापासूनच सत्यनिष्ठावंत होते हे त्यांच्या लहानपणातील काही प्रसंगावरून समजते.

उदा.-

मोठ्या भावाला झालेले कर्ज फेडण्यासाठी दोघांनी मिळून घरातील जी सोन्याची चोरी केली तिचा वडिलांशी त्यांनी कबुली जबाब दिला.

अशाप्रकारच्या साध्या-सोप्या गोष्टीतूनही स्वत:मधील सत्यप्रिय वृत्तीची त्यांनी जी जोपासना केली तिचीच उत्तरायुष्यात सत्याग्रही जीवननिष्ठेत परिणती झाली.

गांधीजींच्या विचाराने व्यक्तिमत्त्वाने अक्षरश: लाखोजणांना स्तिमित करून टाकले. याठिकाणी काही जणांनी नोंदविलेली मते दिली तर ते अप्रस्तुत ठरणार नाही.

अल्बर्ट आईनस्टाईन :

यासारख्या विश्वविख्यात शास्त्रज्ञाने म्हटले आहे, 'गांधीसारखी विभूती कधीकाळी पृथ्वीतलावर सशरीर वावरत होती त्यावर विश्वास ठेवणे पुढच्या पिढ्यांना अवघड

जाईल.''[३] हे विचार काहीजणांना अतिशोक्तीही वाटेल. पण गांधीजींच्या असामान्याची ती कबुली आहे.

आचार्य विनोबा भावे :

एके ठिकाणी म्हणतात, 'गांधीजी एक निराळेच महापुरूष होते. प्राचीन परंपरेचे फळ आणि आधुनिक परंपरेचे बीज आम्हाला गांधीमुळे मिळते. आणि भविष्यात होणाऱ्या महापुरूषाचे बीजसुद्धा गांधीजींनी आम्हाला दिले. गांधीजींच्या जीवनात भूत आणि भविष्य काळाचा संगम आहे.[४] अशा प्रकारची मते अनेकांनी व्यक्त केली आहेत. गांधीजींच्या एकूण जीवन कार्यासंबंधी थोर विचारवंत कै. गं. बा. सरदार म्हणतात, ''गांधीजींचे व्यक्तिमत्त्व हे अत्यंत गुंतागुंतीचे आहे ते एक संघटनाकुशल युगप्रवर्तक राष्ट्रपुरूष होते. त्याचप्रमाणे भारतातील वैष्णव संप्रदायाचे ते एक निष्ठावंत उपासक होते. धर्म हे त्याच्या जीवनाचे प्राणतत्व आहे. वैयक्तिक आणि सामुदायिक कृती हेच माझे आत्माविष्काराचे माध्यम आहे. असे त्यांनी म्हटले आहे. मात्र त्यांच्या कृतीशीलतेत साचेबंदपणाला स्थान नाही. प्रयोगशीलता व परिवर्तनक्षमता यातच त्याच्या जीवनसरणीचे आगळेपण साठवलेले आहे. परिस्थिती जसजशी बदलत गेली तसतसे त्यांचे विचारही बदलत गेलेले आहेत. त्यांचे लेखन विविध प्रकारचे आणि विपुल आहे. आपल्या लेखनातील बाह्य सुसंगतीची त्यांनी फारशी फिकीर केली नाही. पण लिहिताना आपला प्रत्यक्ष अनुभव व सत्यनिष्ठा यांना कुठेही बाधा येऊ नये म्हणून ते खूप काळजी घेत असत. या आपल्या लेखनामुळेच आपल्या लेखनात आपोआपच अंतसंगती साधलेली आहे. असा त्यांचा दावा होता. त्यांच्या विचारांची परिणती त्यांच्या कार्यामधून झालेली आहे. म्हणून त्यांच्या चळवळीचा संदर्भ दृष्टीआड करून आपल्याला त्यांच्या विचाराचे सम्यक परिशिलन करता येणार नाही. राजकारणाला त्यांनी अग्रस्थान दिले होते. पण आपल्या धर्मसाधनेचा एक भाग म्हणून आपण राजकारणात प्रवेश केला. असे त्यांनी अनेकदा म्हटले आहे.

गांधीजी हे द्रष्टे तत्वचिंतक होते. सत्याग्रह दर्शन ही त्यांची खास निर्मिती आहे. धर्म, ईश्वर, सत्य, अहिंसा इत्यादी जुने सर्व परिचित शब्द त्यांनी वारंवार योजले आहेत. पण त्यापैकी प्रत्येक शब्दात अंतर्भूत असलेली संकल्पना त्यांची स्वत:ची आहे. आपल्या सत्याग्रहाचे सांगोपांग विवरण करून त्याचे रहस्य उलघडून दाखवणारा असा सुसूत्र व

सुश्लिष्ट भाष्यग्रंथ त्यांनी लिहिलेला नाही तेव्हा याप्रसंगी त्यांना प्रसंगपरत्वे व्यक्त केलेले विचार, त्याचे धर्मचिंतन आणि राजकारण याचा यथोचित मेळ घालून त्याच्या जीवितकार्याचा सामाजिक आशय शोधावा लागेल.'[५] गांधीजींनी १ ऑगस्ट १९२० रोजी असहकारतेची चळवळ सुरू केली. आपल्या देशातील सर्वसामान्य स्तरातील लोक राजकीय घडामोडीविषयी उदासीन होते. त्यावेळी टिळकांच्या नंतर गांधीकडे राजकारणाची सुत्रे आली आणि जनआंदोलनाचा जमाना सुरू झाला. वेगवेगळ्या थरातील हजारो लोक असहकाराच्या चळवळीत सामील झाले. देशात सर्वत्र नव्यानेच एक स्फुर्तीदायक चैतन्यमय वातावरण फैलावले. 'प्रत्यक्ष कृतीशिवाय सामाजिक जीवनात लक्षणीय बदल घडवून आणता येत नाही.'[६] अशी गांधीजींची धारणा होती या चळवळीतून लोक निर्भय बनले. सरकारच्या दमनयंत्रणेचे दडपण एकदम झुंगारून दिले गेले. पिढ्यानपिढ्या कुंचबून राहिलेल्या शक्ती ह्या जन आंदोलनामुळे बंधमुक्त झाल्या. समाजाच्या वेगवेगळ्या थरात अभुतपूर्व जागृती घडून आली.

'आंदोलनाच्या काळात जी एकजूट घडून येते ती ब्रिटिशविरोधापुरती नैमित्तिक न राहता नित्याच्या सामाजिक जीवनात कायमची स्थिरावली पाहिजे.'[७] असे गांधींना वाटत होते. गांधीजींनी देश स्वातंत्र्याबरोबरच हिंदू मुसलमान ऐक्य, अस्पृश्यतानिवारण आणि ग्रामोद्धार कार्य म्हणजेच स्वराज्य असे त्यांनी वारंवार कार्य म्हणजे स्वराज्य असे त्यांनी वारंवार प्रतिपादन केले. शहरातील सुशिक्षीत कार्यकर्त्यांनी खेड्यात जाऊन तेथील दु:खी कष्टी जनांशी समरस व्हावे त्यांची सेवा करावी, असा त्यांचा आग्रह होता. गांधींचा विधायक कार्यक्रम हा एकाअर्थी सामाजिक सुधारणेचा कार्यक्रम होता.

गांधीजीच्या घरातील वातावरण धार्मिक असले तरी त्यांनी मोठेपणी धर्मग्रंथ वाचूनच आपल्या धर्माविषयी आदर व्यक्त केला व ईश्वरावर दृढ श्रद्धा ठेवली. सर्व माणसे ही ईश्वराची लेकरे आहेत. मग एका माणसाच्या स्पर्शाने दुसऱ्या माणसाला विटाळ का व्हावा हा प्रश्न त्यांच्या मनाला नेहमीच सतावत होता. त्यामुळे अस्पृश्यतेची रुढी त्यांनी समूळ नष्ट करण्यासाठी त्यांनी प्रयत्न केले. 'एकदा गांधीच्या जेष्ठ भगिनी आश्रमातच होत्या त्या अगदी सनातनी मताच्या होत्या. त्यांना आश्रमात ब्राह्मण भंगीकाम करतात हा प्रकार भ्रष्टाचाराचा, पाखंडीपणाचा वाटला. त्या स्वत:साठी वेगळा स्वयंपाक करू

लागल्या. गांधीजींच्या कानावर हे येताच ते त्यांना जाऊन भेटले. येथे कुठल्याच प्रकारचा भेदाभेद चालणार नाही. अस्पृश्यता मान्य असेल तर येथे आश्रमात राहता येणार नाही.'[८] असे गांधींनी त्यांना निक्षुन सांगितले आणि त्याच दिवशी रात्रीच्या गाडीने त्यांची रवानगी केली. अशाप्रकारे त्याच्या आश्रमातील नियम सर्वांसाठी सारखेच आहेत व त्याचे पालन सर्वांनी केले पाहिजे असे त्यांना वाटत होते. त्यासाठी त्यांनी आपल्या बहिणींचाही विचार केला नाही. कसल्या प्रकारची हयगय केली नाही. त्यांना आश्रमातून हाकलून दिले. यावरून गांधीजी अस्पृश्य निवारणासाठी कशाप्रकारे कार्य करीत होते ते समजते.

गांधीजींच्या जीवनात व्रतभावनेला एक आगळेच स्थान आहे. गांधींना लहानपणापासूनच अस्पृश्यता मान्य नव्हती, ते त्यांना आवडत नसे. त्यांच्याकडे प्रखर बुद्धिमत्ता नव्हती पण सहनशीलता, चिकाटी, जिद्द असे गुण त्यांच्याकडे होते आणि म्हणूनच त्यांच्याविषयी आफ्रिकेत वर्णभेद केला तेव्हा अन्यायाविरुद्ध लढा दिला. त्यांच्यामनात अन्यायाविरुद्ध चीड होती. बॅरीस्टर पदवी घेऊन सुटाबुटात आलेले गांधीजी आपल्या देशातील दारिद्रय, गरीबी पाहून सर्वसामान्यासारखेच जीवन जगू लागले, वागू लागले. नंतर धोतर आणि पंचा अशा वस्त्रातच राहून समाजकार्य करू लागले. ब्रिटीशांबरोबर आंदोलन पुकारले आणि देशातील जनतेला खादी वापरण्याचा आग्रह धरला. देश स्वातंत्र्यासाठी मिठाचा सत्याग्रह, आंदोलने, चळवळी, उपोषणे अशी अनेक संघर्ष करून स्वातंत्र्य मिळविले आणि स्वातंत्र्याच्या चळवळीतील एक महान नेता म्हणून अजरामर झाले.

गांधीजींना हिंदू धर्मावरील कलंक नाहिसा करायचा होता. हिंदू धर्मातील अस्पृश्यता नष्ट करावयाची होती. त्यासाठी ते प्रयत्नही करीत होते पण हिंदू धर्मातील अस्पृश्यता कायमची नष्ट होईल अशा प्रकारचे कोणतेही कार्य त्यांनी केले नाही. हिंदू धर्मापासून अस्पृश्य समाज तुटू नये म्हणूनच त्यांनी आंबेडकरांनी इंग्रजाकडून मिळविलेल्या विभक्त मतदार संघाला त्यांनी विरोध केला होता आणि शेवटी उपोषण करून पुणे करारानुसार त्यावर फेरविचार केला आणि आंबेडकरांना माघार घ्यायला भाग पाडले. यापाठीमागे त्यांची एकच इच्छा होती. अस्पृश्य हा हिंदू धर्माचा एक घटक आहे आणि त्यामुळे तो विभक्त झाला तर कायमचा अस्पृश्य म्हणून गणला जाईल. आणि त्यामुळे

त्याना विभक्त न होऊ देता. अस्पृश्यता नष्ट करण्याकडे त्यांनी भर दिला होता. गांधीजींची विचारसरणी विकसनशील होती. सत्य आणि अहिंसा ही दोन मुलभूत तत्त्वे त्यांनी जन्मभर घट्ट धरून ठेवली होती. बाकी सर्व बाबतीत कालमानानुसार यथोचित बदल करण्याची त्यांची तयारी होती. आंतरजातीय विवाहाला त्यांची मान्यता होती. त्याप्रमाणे अंतधर्मीय विवाहाचे स्वागत करण्याची त्यांची तयारी होती. मात्र धर्म ही प्रत्येकाची वैयक्तिक बाब असल्याने वधुवरांनी आपापल्या धर्माला जन्मभर चिकटून राहावे असे त्यांचे मत होते. विवाहविधी कोणत्याही एका पद्धतीने पार पाडावा असे त्यांचे मत होते. सार्वजनिक ठिकाणी किंवा सार्वजनिक समारंभात स्पृश्यास्पृश्यभेद पाळला जाऊ नये असा नियम करावा. असे त्यांचे म्हणणे होते.

'गांधीजींच्या विचारात निष्क्रियतेला, आळशीपणाला, परपुष्टतेला बिलकूल थारा नव्हता. आपल्या दानधर्माच्या, पुण्यसंचयाच्या कल्पना साफ चुकीच्या आहेत. त्यामुळेच आपल्या समाजात भिकाऱ्याचे तांडेच्या तांडे निसंकोचपणे फिरताना दिसतात. आजारी व अपंग माणसे वगळून कुणालाही काम न करता अन्नदान करणे हा सामाजिक गुन्हा आहे. म्हणून माझ्या हाती सत्ता आली तर प्रथम मी देशातील सर्व सदावर्ते बंद करून टाकीन प्रत्येकाने श्रम करूनच आपला उदरनिर्वाह केला पाहिजे. 'दान नको काम हवे' ईश्वराची उपासने समजून काम करा ही सुभाषिते बोलकी आहेत. त्यावर केवळ भाष्य करण्याची गरज नाही. लोकांना मोफत भाकरी देण्यापेक्षा ती स्वत:च्या श्रमाने मिळविण्याची क्षमता त्यांच्या अंगी आली पाहिजे. अंग मोडून काम करण्याची तयारी असली पाहिजे. शोषणमुक्त समाजाची निर्मिती हेच गांधीजींचे ध्येय होते. पण ते त्यांना शांततेच्या मार्गाने साधायचे होते. कामधंदा सोडून चरखा फिरवा असे त्यांनी कुणालाही सांगितले नव्हते मात्र श्रमप्रतिष्ठेचे प्रतिक म्हणून सर्वांनी श्रेष्ठ, सामान्य माणसांनी रोज अर्धा तास तरी सूत कातावे हा त्यांचा आग्रह होता.'[१] शोषणाची प्रवृत्ती नामशेष करून तिच्या ऐवजी सेवाभावाची स्थापना करावी. हा खरे तर चरख्याचा संदेश आहे. गांधीच्या विचारसणीचा थोडक्यात असा अर्थ आहे. शांततामय परिवर्तनासाठी गांधीजी सातत्याने आपल्या विश्वस्त कल्पनेचा पाठपुरावा करीत होते. त्यांचे या प्रश्नासंबंधीचे विचार स्वप्नाळुपणाचे वाटतील. परंतु त्यांच्या भूमिकेतील सच्चेपणाबद्दल कुणी संशय घेईल असे वाटत नाही.

अशाप्रकारे या महापुरूषाविषयी त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा चोहोअंगांनी अभ्यास करून आढावा घेता येतो.

## डॉ. आंबेडकरांचे व्यक्तीमत्त्व :

डॉ. बाबासाहेब उर्फ भीमराव रामजी आंबेडकर या महामानवाचे व्यक्तिमत्त्व हे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व होते. त्यांचे व्यक्तिमत्त्व इतके भव्य आणि दिव्य होते की, तेथे असंख्य उपमा अलंकार कमी पडतात. इतके दैदिप्यमान व्यक्तीमत्त्व बाबासाहेबांच्या रुपाने आपल्या देशाला लाभले. बाबासाहेबांच्या राजगृहाचा एक विभाग जगातील प्रसिद्ध थोर स्त्री-पुरुषांच्या चरित्राने भरगच्च भरलेला होता. त्या सर्व थोरांचे जीवन त्यांनी आकलन करून घेतले होते. जगातील सर्व थोर पुरूषांना त्यांनी अचूक जोखले होते. बाबासाहेबांनी आपले घर 'राजगृह' जगातील ज्ञानाचे एक स्वयंपूर्ण विश्वविद्यालय केंद्र बनवून ठेवले होते. या विश्वसांस्कृतीक केंद्रातूनच त्यांचे विश्वभूषण व्यक्तिमत्त्व विकसित झालेले दिसून येते. बाबासाहेबांचे असे हे व्यक्तीमत्त्व हे कोणी 'बहाल' केलेले नसून त्यांनी स्वसामर्थ्यावर जाणीवपूर्वक कमविलेले व्यक्तिमत्त्व होते. अशा या महामानवाचा जन्म बाबासाहेबांचे वडील मध्यप्रदेशातील महू या गावी नोकरीस आले तेव्हा सोमवार दिनांक १४ एप्रिल १८९१ साली झाला आणि या सुपूत्राचे नाव 'भीमराव' ठेवण्यात आले. बालपणी त्यांना 'भिवा' म्हणून ओळखले जात होते. मोठेपणी १९३३ साली त्यांना बाबासाहेब या आदराच्या नावाने ओळखण्यात येऊ लागले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या घराण्याचा उद्धार केलाच पण त्यांनी अस्पृश्य समाजाचाही उद्धार केला. बाबासाहेबांचे पूर्वज तसे कर्तृत्ववान आणि कर्तबगार होते. त्यांनी त्यांच्या आयुष्यात चातुर्वर्ण्य व्यवस्थेला व जातीव्यवस्थेला शह देण्यासाठीच आपले गाव-घर सोडले. त्याचप्रमाणे आईकडील पूर्वजही कर्तव्यदक्ष उद्योगशील वृत्तीचे होते. लक्ष्मणराव मुरबाडकर पंडीत यांनी कर्तव्यदक्ष सुभेदार म्हणून आपले नाव गाजविले होते. अशाप्रकारे युगप्रवर्तक व्यक्तिमत्त्वाच्या जडण-घडणीमध्ये त्यांच्या पूर्वजांच्या सुसंस्कृत ऐतिहासिक वातावरणाचा अत्यंत मौलिक असा लाभ झाला होता. त्यांच्या पूर्वजांना गुलामगिरीला शह देण्याची जाणीव निर्माण झाली होती. ही जाणीवच पूर्वजांचे जागृतीचे उगमस्थान होते. या उगमातूनच जागृतीचा नंदादीप सतत तेवत ठेवणारा आणि

वर्णव्यवस्थेच्या भारताला हादरे देऊन नवभारत निर्माण करणारा ज्वालामुखीरूपी बाबासाहेब उदयास आले आणि विश्वभूषण म्हणून नावलौकीक झाले. भारतात असणाऱ्या वर्णव्यवस्थेमुळे शुद्रअतिशुद्रांचे व्यक्तिमत्त्व लयास गेले होते. एकप्रकारे भारताच्या व्यक्तिमत्त्वाचा पर्यायाने लोप झाला होता. त्यामुळेच १५० वर्षे आपल्या देशाला इंग्रजांच्या गुलामगिरीत राहावे लागले. वर्ण आणि जातीव्यवस्था भारतात असेपर्यंत कोणासही माणूस म्हणून जगणे कठीण होते अशा परिस्थितीत बाबासाहेबांनी आपल्या जीवनकार्याने सर्व भारतीयांना आणि सर्व जगालाच खडखडून जागे केले. वर्ण व्यवस्थेच्या विषारी वर्तुळातून बाहेर पडण्याचा मार्गही दाखवला आणि साऱ्या जगाला या विषारी प्रवृत्तीपासून सावध राहण्याचा इशाराही दिला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्वामध्ये त्यांच्या जडणघडणीमध्ये अनेकांच्या प्रेरणा त्यांना मिळाल्या होत्या. त्यामध्ये त्यांचे पूर्वज, कबीरपंथी आई-वडील, केळुस्कर गुरुजी इतर शिक्षक, पत्नी रमाबाई, सयाजीराव गायकवाड महाराज, शाहू महाराज, बुद्ध, कबीर, फुले, पाश्चात्य देश आणि तेथील मार्गदर्शक, सहकारी, मित्र-मैत्रिणी या सर्वांच्या सहयोगाच्या प्रेरणेने त्यांना अथांग महासागरासारखे व्यक्तीमत्त्व लाभले आहे. त्याचप्रमाणे त्यांच्या समग्र जीवनाकडे पाहिल्यास 'अत् दीप भव!' म्हणजेच 'स्वयंम प्रकाशित व्हा!' या बुद्धाच्या संदेशाप्रमाणे बाबासाहेबांनी स्वत:स घडविले आहे. अनंत परिश्रमाने आणि जिद्दीने आपली उन्नती करून ते स्वयंप्रकाशित झाले आहेत आणि या प्रज्ञासूर्याने आपले व्यक्तीमत्त्व जगभर प्रकाशित केलेले दिसून येते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे बालव्यक्तीमत्त्व पाहत असताना बाबासाहेब वयवर्षे तीन असताना त्यांच्या वडीलांची नोकरी संपली आणि त्यांना पेन्शन घेऊन सेवानिवृत्ती घ्यावी लागली. बाबासाहेब पाच वर्षाचे असताना त्यांची आई वारली. (२७ मे १८९७) तेव्हापासून बाबासाहेबांची हालअपेष्टा होऊ लागली व त्यांच्या खडतरीच्या जीवनाला सुरूवात झाली. यानंतरचे अत्यंत प्रतिकुल परिस्थितीतून बाबासाहेबांचे बालपण गेले. त्यांना लहानपणापासूनच स्वत:च्या उन्नतीसाठी अनंत कष्ट करावे लागले. वेळप्रसंगी गावातून लाकडे फोडणे, माळ्याची कामे करणे, गुरे वळविणे अशी कामे केली. त्यामुळे अत्यंत व्यथा वेदनेतून त्यांचे बाल व्यक्तीमत्त्व तावून निघाले होते. बाबासाहेबांचे कुटुंब

साताऱ्यास आले तेव्हापासून त्यांना अस्पृश्यतेचे चटके बसू लागले. त्यासंदर्भात बाबासाहेब सांगतात, 'सातारा जिल्ह्यातील गोरेगावी दुष्काळ पडला होता. म्हणून दुष्काळी कामे सरकारने काढली. यावेळी एक पाण्याचा तलाव सुरू करण्यात आला होता. या तलावाचे काम करणाऱ्या मजुरांना पगार वाटण्याचे कामावर माझे वडीलांची नेमणूक झाली. ते गोरेगावी गेले व आम्हा चार मुलांना साताऱ्यास ठेवले. जवळजवळ चारपाच वर्षे आम्ही भातावर काढली. आम्ही साताऱ्यास आल्यापासून आम्हाला खऱ्या अस्पृश्यतेची जाणीव होऊ लागली.'[१] परंतु ते अस्पृश्यतेचे दंश बाबासाहेबांनी सहन करण्याचे नाकारले होते. बाबासाहेबांच्या स्वाभीमानी प्रतिक्रियाचे द्वंद्व त्यांच्या बालपणीच चालू झाले होते. त्या द्वंद्वातून आणि मानसिक संघर्षातूनच बाबासाहेबांचे व्यक्तीमत्त्व आकार घेत होते. डॉ. आंबेडकर मॅट्रीक परीक्षा पास झाले तेव्हा कृष्णा अर्जुन केळुस्कर गुरुजी यांनी स्वलिखित बुद्धचरित्र त्यांना बक्षिस दिले होते. आणि हीच बाबासाहेबांच्या व्यक्तीमत्त्वाची प्रथम प्रेरणा ठरते. हे पुस्तक वाचूनच बाबासाहेबांची बुद्ध विचारसरणी ही प्रेरणा होती. बुद्धांच्या चरित्रामुळे त्यांना अधिक ज्ञान ग्रहण करण्याची प्रेरणा मिळाली. त्यांच्या जीवनाला एक कलाटणी मिळाली आणि जीवनकार्याला एक आदर्श दिशा मिळाली.

भगवान गौतम बुद्ध म्हणाले, 'केवळ एखादी गोष्ट मी तुम्हाला सांगतो म्हणूनच ती सत्य असली पाहिजे असे तुम्ही बिलकुल मानू नका. ती गोष्ट तुमच्या विचारशक्तीला तर्कशक्तीला पटत असेल तरच तुम्ही ती स्वीकारा नाहीतर तुम्ही ती खुशाल टाकून द्या'[२] डॉ. आंबेडकरांचेही हेच म्हणणे होते. अशा या विचारामुळेच बाबासाहेबांना स्वतंत्र विचार करण्याची व प्रत्येक विचाराची वस्तुनिष्ट विचारांची चिकित्सा करण्याची सवय लागली होती. त्यातूनच त्यांचे प्रखर असे बुद्धीवादी व्यक्तीमत्त्व उदयास आले. त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेचा बुद्धाच्या तत्त्वज्ञानातूनच विकास झाला. बाबासाहेब बुद्धाच्या प्रभावामुळेच धम्म प्रवर्तक म्हणून आधुनिक जगात अजरामर झाले. बुद्धांच्या विचार परंपरेला विकसित आणि प्रगल्भ गोड फळ म्हणून बाबासाहेबांनाच मानावे लागते. त्यामुळे बुद्धाला लाभलेले ते एकमेव जागतिक पातळीवरचे पहिले विद्वान होय. एवढेच नव्हे तर ते आधुनिक युगाचे प्रबुद्धच ठरतात. बुद्धाने पहिल्यांदा धम्मचक्र प्रवर्तन केले, तर डॉ. आंबेडकरांनी दुसऱ्यांदा १४ ऑक्टोबर १९५६ रोजी धम्मचक्र प्रवर्तन केले या दिवशी नागपूरला कोट्यावधी

अनुयायांची गर्दी असते. एवढी लोकप्रियता जगातील कोणत्याही महापुरूषाची आढळत नाही. यावरून त्यांचे युगप्रवर्तक व्यक्तीमत्त्व होत असे दिसून येते.

डॉ. बाबासाहेबांनी तीन गुरू मानले होते. बुद्ध, कबीर, म. फुले असे हे तीन गुरू होय. यांच्या विचारातूनच त्यांची वैचारिक जडण-घडण होऊन त्यांच्या व्यक्तीमत्त्वात भर पडली आणि ते महामानव बनले. मॅट्रीक पास झाल्यानंतर बाबासाहेबांना सयाजीराव गायकवाड यांनी पुढील शिक्षणासाठी शिष्यवृत्ती मंजूर केली व विलायतेला पाठविले. तेथे त्यांनी आपल्या प्रगाढ बुद्धिमत्तेने आणि कर्तृत्वाने, कष्टाने चीज करून दाखविले. खूप विद्या संपादन केली. त्यावेळी ते १८-२० तास अभ्यास करायचे आणि आपली बौद्धिक पातळी वाढवायचे. त्यांनी एम. ए., पीएच.डी., एम.एस्सी., डी. एस्सी., बार ॲट लॉ (बॅरिस्टर), एल.एल.डी., डी. लिट, अशा पदव्या संपादन केल्या होत्या. त्यांच्या या अशा बौद्धिक कार्यामुळे आणि समाजकार्यामुळे त्यांच्या उत्तुंग जीवनकार्यामुळे त्यांना भारत सरकारने १९९१ साली त्यांच्या जन्मशताब्दी वर्षात 'भारतरत्न' ही बहुमानाची उतिउच्च पदवी देऊन, डॉ. बाबासाहेबांच्या साहित्य व जीवनकार्याचा गौरव केला. अशा या महामानवाने एवढ्या पदव्या संपादन केल्या आहेत. यावरूनच त्यांचे बौद्धीक व्यक्तीमत्त्व किती प्रगल्भ आणि उत्तुंग असावे हे आपणास जाणवते.

डॉ. बाबासाहेब हे बॅरिस्टर पदवी घेऊन आल्यानंतर सयाजीराव गायकवाड महाराजांच्या संस्थानात नियमानुसार कामावर हजर झाले तेव्हा त्याठिकाणी खूप कटू अनुभव आले. त्यांना लोक महार बॅरिस्टर म्हणून चिडवत असत. साधा शिपाई देखील त्यांना योग्य सेवा देत नसत. एवढे मोठे शिक्षण घेऊनही त्यांना अस्पृश्यतेमुळे हिन समजले जायचे. त्यामुळे त्यांना त्या ठिकाणी राहायला जागाही मिळाली नव्हती. लहान पणापासून त्यांना असे अनेक कटू अनुभव येत होते म्हणून त्यांनी अस्पृश्यता नष्ट करून जातीहीन समाज बनवण्याचे ठरविले. व समाजसुधारणेचे काम स्वीकारले. अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी त्यांनी खूप प्रयत्न केले. महाडला चवदार तळ्याचा सत्याग्रह, मनुस्मृती दहन करण्याचा कार्यक्रम, नाशिकला काळाराम मंदिर सत्याग्रह असे अनेक संघर्ष त्यांनी केले. आपला दलित समाज सुधारण्यासाठी आणि त्यांना अस्पृश्यतेतून मुक्त करण्यासाठी त्यांनी हिंदू सवर्ण लोकांशी खूप संघर्ष केला पण जातीपातीची मुळे रुतलेला हा हिंदू सवर्ण वर्ग

दलित वर्गाला आपले कधीच म्हणणार नाही. तेव्हा त्याच्यावरील होणारे अन्याय कधीच थांबणार नाहीत आणि हा आपला भोळा अडाणी समाज या अस्पृश्यतेच्या दरीतून बाहेर काढण्याचे काम त्यांनी केले. त्याची सुरूवात चवदार तळ्यापासून केली. सत्याग्रहाविषयी बोलताना ते एके ठिकाणी म्हणतात, 'आज आपण मंदिर प्रवेश करणार आहोत. पण मंदिर प्रवेशाने तुमचा सर्वच प्रश्न सुटेल असे मुळीच म्हणता येणार नाही. आपल्या प्रश्नाचे स्वरूप व्यापक आहे. ते राजकीय, सामाजिक, आर्थिक, धार्मिक, शैक्षणिक अशा स्वरुपाचे आहे. पण आजचा आपला हा काळाराम मंदिर प्रवेश सत्याग्रह हा उच्चवर्णीय हिंदू मनास एक प्रकारचे आव्हान आहे. शेकडो वर्षे उच्चवर्णीय हिंदूनी आम्हाला माणुसकीच्या हक्कापासून दूर ठेवले, तेच हिंदू आपल्याला माणुसकीचे अधिकार देण्यास तयार आहेत का नाही, हाच एक प्रश्न मंदिर प्रवेश सत्याग्रहातून होणार आहे. हिंदू मन खऱ्या-खुऱ्या माणसाला माणूस म्हणावयास तयार आहे का नाही? हाच प्रश्न या सत्याग्रहातून दृष्टोत्पत्तीस येणार आहे. उच्चवर्णीय हिंदूनी आपल्याला कुत्र्या, मांजरापेक्षाही हीन लेखले. पण आतातरी तेच हिंदू आपल्यासारख्या माणसांना माणूस म्हणून किंमत देणार आहे नाही? ह्याच प्रश्नाचे उत्तर आपल्याला मिळणार आहे. हा सत्याग्रह हिंदूच्या हृदय-मंदिरात बदल करण्यासाठी आहे. तो यशस्वी होणे न होणे हे हिंदूच्या मनोरचनेवर अवलंबून आहे.''[३] परंतु त्यांच्या सत्याग्रहाचा हिंदू मनावर कोणताही परिणाम झाला नाही व त्यांनी दलित समाजाला माणूस म्हणून किंमत दिली नाही. अशा या आपल्या व समाजाच्या अपमानकारक वागणूकीच्या मुळावर आघात करण्यासाठी त्यांनी येवला परिषदेत जाहीर करून टाकले, 'मी हिंदू म्हणून जन्मलो असलो तरी, जन्म हा कोणाच्या हातात नाही हिंदू म्हणून मी मरणार नाही.'[४] आपल्या धर्मातराच्या निश्चयानंतर त्यांनी २०-२१ वर्षे हिंदू समाज सुधारण्याची वाट पाहिली व शेवटी सर्व अभ्यासाअंती बौद्ध धर्म स्वीकारला. आपल्या सात लक्ष बांधवासह त्यांनी नागपूर येथे बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि हिंदू धर्माचे नाते तोडून नवीन मानवतेच्या धम्मानुसार ताट मानेने जगण्यास आपल्या समाजाला स्वातंत्र्य मिळवून दिले. तत्पूर्वी त्यांना मुस्लिम, ख्रिश्चन अशा धर्मात प्रवेश करण्याबद्दल निमंत्रणे आली होती. पण बाबासाहेबांना मानवतावादी धर्म हवा होता. आणि त्यांनी इतर

14763

धर्माचा विचार व अभ्यास करूनच बौद्ध धम्म स्वीकारला. सर्व जगाला तारणारा हा एकच धम्म आहे.

डॉ. बाबासाहेबांनी खूप कष्टातून ज्ञान मिळविले होते. भारतातील जाती, सैद्धांतिक स्वरूप, जातीचे मूळ, मनु व जातीव्यवस्था या संदर्भात बाबासाहेबांनी त्यांच्या प्रबंधात मांडलेले विचार लक्षात घेता त्यांचे वैचारिक व वाङ्मयीन व्यक्तीमत्त्व परिपक्व व प्रगल्भ बनलेले दिसून येते. बंद केलेला वर्ग म्हणजे जात. ब्राह्मणांनी प्रथम कुंपण घालून जात निर्माण केली. रुढी, धर्मशास्त्र, मनुस्मृती यातून जाती निर्माण झाल्या असे नसून जातीव्यवस्थेचे गोडवे व उदारीकरण त्यांनी केले. सतीची चाल, कायमचे वैधव्य, सन्यास, ब्रह्मश्चर्य व बालविवाह इत्यादी रुढींनी जाती निर्माण केल्या नसून जाती टिकविण्यासाठी या रूढी निर्माण करण्यात आल्या. ब्राह्मण वर्गाने स्वत: भोवती कुंपन घालून आपल्या वर्गाचे जातीत रूपांतर केले. त्याचे अनुकरण क्रमाने लगतच्या वर्गाने केले त्यामुळे जाती निर्माण झाल्या. एक धर्मशास्त्र आणि ईश्वर याचा आधार उडविला, की जाती नष्ट करण्याचे कार्य सुलभ होते. त्यामुळे भारत एकात्म होईल. असे बाबासाहेबांचे त्यांच्या संशोधनामागचे उद्दिष्ट होते.

डॉ. बाबासाहेबांच्या व्यक्तीमत्त्वाची जडण-घडण अमेरिकेच्या वातावरणात उत्कृष्ट झाली. त्यांना अमेरिकेमध्ये प्रोत्साहन, उत्तेजन, प्रेरणा, स्फुर्ती, शाबासकी, मान-सन्मान, गौरव प्रशंसा, स्तुती आणि गौरवपर अनेक विशेषणे बाबासाहेबांच्या बुद्धिमत्तेबद्दल, युक्तीवादाबद्दल आणि प्रभावी व्यक्तीमत्त्वाबद्दल प्राप्त झाली. मात्र भारतात निर्भत्सना, अवहेलना व अपमानच त्यांच्या वाट्याला आला असे आढळते. बाबासाहेबांच्या व्यक्तीमत्त्वातील वैचारिकपणा विकसित होण्यासाठी अमेरिकेतील वातावरण तेथील संशोधक, मार्गदर्शन, प्राध्यापक, नवचैतन्यशील ग्रंथालय, शिक्षण पद्धती आणि संस्कृती या सर्वांचा अनुकूल प्रभाव आणि परिणाम झालेला आढळतो. त्याचप्रमाणे तेथील काही विचारवंताचाही प्रभाव त्यांच्यावर आढळतो.

डॉ. बाबासाहेबांच्या व्यक्तीमत्त्वाचा विचार करीत असताना ते स्वतंत्र विचाराचे तत्ववेत्ते होते. त्यांचे स्वतंत्र विचाराचे व्यक्तीमत्त्व असे गेले होते. याबाबत ते स्वत: म्हणतात. 'मी स्वत:च विचार करू लागलो खूप वाचन करू लागलो, त्यातून धडा मिळाला

की, स्वत:च्या पायावर उभे राहून स्वत:लाच मार्गदर्शन करता येते. मी एवढे जबरदस्त वाचन केले आहे की, कोणता संदर्भ कोठे आहे याचे मला ताबडतोब स्मरण होते या वाचनामुळे माझी स्मरणशक्ती दांडगी होत गेली."[५] डॉ. आंबेडकर म्हणतात, असा मी जगलो - डॉ. बाबासाहेब परदेशातून आल्यानंतर ते जसे चळवळीत उतरले तसे त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिकच चमकण्यास सुरुवात झाली. त्यांनी दोन आघाड्या बनविल्या. एक आघाडी लेखनाची, दुसरी आघाडी चळवळीची. या दोन आघाड्यांवर सामना जस-जसा होऊ लागला. तस-तसे त्यांचे व्यक्तीमत्त्व प्रखर होऊ लागले. त्यामुळे लेखन, चळवळ व व्यक्तिमत्त्व या तिघांचा मिलाप इतका बेमालूम झालेला आढळतो की, एकापासून दुसऱ्याला अलगच करता येत नाही. त्यांच्या लेखन आणि चळवळ यामुळे त्यांची व्यक्तिमत्त्वाची तेजस्वीता वाढली असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही.

डॉ. बाबासाहेबांची नवभारत निर्माण व्हावा अशी इच्छा होती. त्याप्रमाणे ते प्रयत्नही करीत होते. ते जसे लेखन करीत होते तसेच धैर्य ते चळवळीत उतरविण्यासाठी धडपडत होते. त्यांनी क्रांतीकारी विषय व क्रांतीकारी चळवळ हाताळण्याचे धैर्य व ज्ञान प्राप्त करून घेतले होते. त्यातच त्यांच्या प्रगल्भ व्यक्तिमत्त्वाचे प्रखरतेचे मर्म सामावलेले आहे. पूर्ण त्यांच्या व्यक्तिमत्त्वाकडे लक्ष टाकल्यास आपणास असे दिसून येते की, त्यांना लहानपणी अमानुष हाल व प्रचंड छळ सोसत अत्यंत तीव्र व्यथा वेदना प्रतिकूल परिस्थितीशी सामना करावा लागला आहे आणि या जीवघेण्या वेदनेतूनच त्यांचे व्यक्तिमत्त्व तेजस्वी बनत गेले. १९१३-२३ नंतरच्या काळात त्यांनी अखंड परिश्रमाने अत्यंत उच्च दर्जाचे ज्ञान आणि पदव्या संपादन करून उत्तुंग व्यक्तिमत्त्व जाणिवपूर्वक बनविले. संशोधन लेखन व चळवळ यापुढे त्यांचे दैदीप्यमान व्यक्तिमत्त्व जागतिक पातळीवर सुप्रसिद्ध झाले होते. कोलंबिया विद्यापीठ, लंडन विद्यापीठ, जर्मनचे बॉन विद्यापीठ या जगातील सर्वश्रेष्ठ विद्यापिठाच्या पदव्या त्यांनी अत्यंत सखोल अभ्यासाने मिळविल्या होत्या. त्यांनी १९१९ साली सायमन निवेदन देऊन सार्वजनिक जीवनात प्रतिनिधीत्व करून भारतीय नेतृत्वाची जोपासना केली. १९२० ला 'मूकनायक' वृत्तपत्र सुरू करून समाज प्रबोधनासाठी वृत्तपत्र माध्यमाचा साधन म्हणून वापर सुरू केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १९२३ ते १९५६ या समग्र काळामध्ये पाहिल्यास या कालखंडामध्ये बाबासाहेबांनी सामाजिक चळवळीबाबत बहिष्कृत हितकारणी सभा, स्वतंत्र मजूर पक्ष, गोलमेज परिषद, पुणे करार, येवला धर्मांतर घोषणा, शेड्युल्ड कास्ट फेडरेशन आणि शेवटी धर्मांतर बाबतीत केलेले कार्य पाहता आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाही. त्यांनी सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, वृत्तपत्र, राज्यघटना इत्यादी बाबतीत केलेल्या असामान्य कर्तृत्वातून असामान्य विश्वभूषण व्यक्तिमत्त्व साकारलेले आढळते. अशाप्रकारे बाबासाहेबांच्या व्यक्तिमत्त्वाच्या जडण घडणीत आई-वडील, पत्नी, आत्या, शाहू महाराज, सयाजीराव गायकवाड महाराज, त्यांचे शिक्षक, मार्गदर्शक, त्यांचे गुरू, बुद्ध, कबीर, म. फुले, अशा अनेकांच्या सहकार्यातून आशिर्वादातून बाबासाहेबांचे व्यक्तिमत्त्व घडले. डॉ. बाबासाहेबांच्या सर्व व्यक्तिमत्त्वाच्या अनेक पैलूंपेक्षा बुद्धिमत्ता हा त्यांच्या व्यक्तीमत्त्वाचा सर्वश्रेष्ठ पैलू आहे. त्यांना मानववंशशास्त्र, समाजशास्त्र, अर्थशास्त्र, विद्याशास्त्र इत्यादी अनेक विविध शास्त्राचा सखोल व्यासंग त्यांनी केला कारण स्वप्रज्ञा बाबासाहेबाकडे होती. त्यामुळे त्यांनी कोणाचेही अनुकरण केले नाही. कोणाच्याही उसण्या विचाराला शरण जाणे त्यांच्याकडून घडले नाही.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल त्यांच्या द्वितीय पत्नी डॉ. माईसाहेब (सविता) आंबेडकर म्हणतात, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे व्यक्तिमत्त्व अत्यंत भारदस्त होते. त्यांचे भव्य कपाळ तेजस्वी आणि भेदक डोळे, धारदार नजर, अत्याधुनिक व टापटीप पोशाख, चेहऱ्यावर विलसत असलेले विद्वतेचे तेज पाहून प्रथम दर्शनीच त्यांच्या असामान्यत्वाची खात्री पटत असे. परदेशी लोक डॉ. आंबेडकरांना 'जर्मन राजपूत्र' असे का संबोधित याची प्रचिती त्यांना पाहणाऱ्याला प्रथमदर्शनीच येत असे. त्यांच्या भारदस्त व्यक्तीमत्त्वाला प्रकांड विद्वत्तेची जोड मिळाल्याने त्यांचा वेगळाच प्रभाव पडत असे.'[६] एका भेटीत डॉ. आंबेडकरांनी झालेल्या चर्चेत बौद्ध धर्माविषयी बाबासाहेबांचा किती गाढा अभ्यास होता याविषयी माईसाहेब सांगतात, 'डॉ. आंबेडकरांचे बौद्ध धर्माचे अथांग ज्ञान बघून मी अक्षरशः दिपून गेले. डॉ. आंबेडकरांच्या प्रत्येक शब्दातून प्रकांड ज्ञान व अथांग विद्वत्ता प्रकट होत असे. आपला मुद्दा पटवून देत असताना त्यांच्या समर्थनार्थ ते अनेक पुरावे, दाखले व उदाहरणे देऊन आपला मुद्दा सर्व प्रकारे स्पष्ट

करून पटवून देत असत. त्यांचा युक्तीवाद इतका साधार व बिनतोड असे की, अगदी कट्टर विरोधकालाही मान डोलवावी लागत असे. त्यांच्या प्रत्येक शब्दामागे प्रचंड वाचन, मनन व ठाम निष्कर्ष दिसून येत असे.''[७]

''डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राजकीय कार्य, सामाजिक कार्य, शैक्षणिक कार्य, आर्थिक कार्य तसेच इतर अनेक क्षेत्रात आपल्या व्यक्तीमत्त्वाचा ठसा उमठविला आहे. गं. बा. सरदार म्हणतात, 'आंबेडकरांचे व्यक्तीत्व आणि विचारसरणी यामध्ये विज्ञाननिष्ठ उद्योगप्रधान आधुनिक संस्कृतीचा आशय ओतप्रोत भरून राहिला होता. इंग्लंडला अमेरिकेसारख्या प्रगत देशातील विद्यापीठीय वातावरणात त्यांच्या विचारांची जडण-घडण झालेली होती. त्यामुळे सखोल व अद्ययावत ज्ञानाची थोरवी त्यांना उमगली होती. सामाजिक शास्त्राच्या अध्ययनाची शिस्त त्यांच्या अंगी बाणली होती. अर्थशास्त्र, समाजशास्त्र, राज्यशास्त्र, मानवविज्ञान, इतिहास, तत्वज्ञान, कायदेपद्धती इत्यादी शास्त्राचा गाढा व्यासंग होता. परदेशातील विद्यापीठांच्या अत्युच्च पदव्या संपादन करून ते स्वस्थ बसले नाहीत. ज्ञानोपासना हे त्यांच्या जीवनाचे प्राणतत्व होते. 'मी जरी राजकारणात, समाजकारणात पडलो असलो तरी आजन्म विद्यार्थी आहे.' हे त्यांचे म्हणणे खरे आहे.''[८] राजकारणातदेखील बाबासाहेबांनी आपल्या अस्पृश्य समाजाचा उद्धार करण्याच्या हेतूनेच प्रवेश केला होता आणि तो त्यांनी भारतीय राज्यघटना लिहून साध्यही केला आहे. असे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे व्यक्तीमत्त्व सर्व अंगानी अष्ठपैलू व्यक्तिमत्त्व ठरते आणि हे सर्व त्यांच्या अभ्यासावरून आपणाला समजते. अशी ही अष्ठपैलू व्यक्तीमत्त्व असणाऱ्या महामानवाने आपले आयुष्य अस्पृश्योद्धारांच्या विकासासाठी घालवले व स्वतंत्र भारताला राज्यघटना लिहून देऊन भारतीय इतिहासात आपले नाव अजरामर केले.

### गांधी–आंबेडकर आणि दलित नाटक :

दलित साहित्यामध्ये कविता, कथा, कादंबरी, नाटक अशा प्रकारामध्ये अस्पृश्यता, धर्मांतर, स्वतंत्र मतदार संघ, पुणे करार, पाकिस्तान फाळणी अशा इतिहासातील घटनाप्रसंगावर लिहित असताना आंबेडकरांबरोबरच गांधीजींची भूमिका मांडणे/येणे साहजिक आहे. त्यामुळे दलित नाटकाची निर्मिती होत असताना गांधी-आंबेडकरांच्या विषयावर नाटक लिहित असताना त्यांच्यामधील वैचारिक, धार्मिक,

सांस्कृतिक, शैक्षणिक, आर्थिक संघर्ष तसेच गांधी-आंबेडकरांची दलितांविषयीची भूमिका याची वास्तव मांडणी होऊ लागली.

दलित साहित्याने, दलित नाटकाने दलित समाज परिवर्तनाचे कार्य केले आहे. आपल्या मांडणीतून, सादरीकरणातून दलित नाटकाने वास्तव जीवनावर घटनांवर प्रकाश टाकून आपल्या समाजातील जुन्या रूढ परंपरांना छेद देण्याचे काम केल्याचे दिसते. दलित समाज फुले-शाहू-आंबेडकरांच्या प्रेरणेने जगू लागला. आपला विकास करून घेऊ लागला. अन्याय अत्याचाराच्या ठिकाणी बंडही करू लागला. दलित साहित्य फुले, शाहू, आंबेडकरी विचार मांडून झोपलेल्या समाजाला जागे करण्याचे काम करू लागले. दलित साहित्यात कविता, कथा, कादंबरी, वैचारिक लेखन, नाटक यामधून आंबेडकर-गांधींचे विचारदर्शन होऊ लागले. काय खरे काय खोटे पण इतिहासात घडलेल्या घटनांचा आधार घेऊन गांधी-आंबेडकर यांच्यातील वैचारिक संघर्ष नाटकाच्या रूपाने रंगभूमीवर सादर होऊ लागला. त्यांच्या कार्याची भूमिका, त्यांचे विचार, त्यांचा संघर्ष हे कलावंत नाटकात मांडू लागले व त्यातूनच त्यांचे व्यक्तीमत्त्व दिसून येऊ लागले. मूळ व्यक्तीमत्त्व आणि नाटकातील व्यक्तीमत्त्व असा विचार होऊ लागला. त्याचा अभ्यास करीत असताना त्यामध्ये फरक जाणवणे साहजिकच आहे.

कोणतीही कलाकृती वास्तव नसून वास्तवाचा अभ्यास असतो. मग ती कोणतीही कलाकृती असो. कलाकृती प्रभावी व आकर्षक करण्यासाठी लेखक स्वत:च्या काही गुणांचा वापर करून ती कलाकृती दर्जेदार होण्यासाठी प्रयत्न करत असतो. उदा. - गांधी-आंबेडकर हे नाटक आकर्षक करण्यासाठी वेळेचे बंधन ध्यानात घेऊन आणि त्यांचा एवढामोठा इतिहास ध्यानात घेऊन नाटकाच्या अंगाने त्यांची मांडणी करीत असताना मुख्य घटना-प्रसंगावर भर देऊन स्वत:ची युक्ती लढवून, वास्तवाचा थोडा स्पर्श आणि कल्पकतेची जोड देऊन ते नाटक मनोविश्लेषणात्मक मांडणी करून मूळ घटनांना धक्का न पोहचविता आकर्षक बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

नाटक म्हटल्यानंतर संवाद आणि व्यक्तिमत्त्व या दोन गोष्टी ते पात्र प्रभावी ठरण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या आहेत. या गोष्टीचा विचार केल्यास संबंधित दोन नाटकांमध्ये गांधीजी व आंबेडकर या दोन व्यक्तीमत्त्वाची निर्मिती, मांडणी, अभिव्यक्ती ही

अगदी हुबेहूब व तटस्थपणे मांडल्याचे आपल्याला जाणवते. त्यापाठीमागचे कारणही तसेच आहे. म्हणजे ही दोन्ही व्यक्तीमत्त्वे सामाजिक, राजकीय, शैक्षणिक व धार्मिक या सर्वांगाने परिपूर्ण असणारी अशी आहेत. त्यांच्याविषयी काही म्हणजे कल्पना थोडीच पण वास्तव स्पष्ट लिहण हे क्रमप्राप्त आहे. हे दोन्हीही नाटककारांनी अगदी मनापासून ओळखूनच या नाटकांची निर्मिती केलेली आहे. प्रेमानंद गज्वी आपल्या नाटकाच्या प्रस्तावनेत म्हणतात की, 'उद्या गांधी-आंबेडकरांच्या संदर्भात मला वेगळे पैलू गवसले तर स्वाभाविकच या नाटकाचे पुनर्लेखन मला अभिप्रेत आहे.' या गोष्टीचा विचार करता या दोन्ही व्यक्तीमत्वाचे प्रत्यक्ष जीवन आणि नाटकाच्या रूपाने आलेले व्यक्तिमत्त्व यात तफावत असणं साहजिकच आहे. त्याचप्रमाणे भालचंद्र फडकेंनी आपल्या नाटकाच्या प्रस्तावनेत लिहिले आहे की, 'डॉ. आंबेडकर आणि गांधीजी' यांच्यातील संघर्ष नाटकातून चित्रित करावा असे खूप वाटे, म्हणून हे नाटक लिहले असे ते सांगतात. म्हणजे मुळे व्यक्तिमत्त्व आणि संघर्षासाठी नाटकातील निर्माण केलेले व्यक्तीमत्त्व यात थोडीशी तफावत असणार हे दिसून येते.

या दोन्ही नाटकातील या दोन्ही महामानवांच्या मूळ व्यक्तिमत्त्वाचा आणि नाटकातील व्यक्तिमत्त्वाचा विचार करीत असताना त्यामध्ये असे दिसते की, प्रेमानंद गज्वी आणि भालचंद्र फडके यांनी गांधी-आंबेडकर यांच्यातील घटना प्रसंग त्यामध्ये महत्त्वाचा म्हणजे संघर्ष हा इतिहासाला तटस्थ राहून आपल्या कल्पना आणि योजनाबद्ध पद्धतीने ही व्यक्तिमत्त्वे चित्रीत करण्याचा प्रयत्न केलेला आहे. नाटकांचा अभ्यास करीत असताना घटना प्रसंगाच्या रूपाने त्यांचे व्यक्तीमत्त्व समोर येऊ लागते. आंबेडकरांचे व्यक्तिमत्त्व हे बंडखोर, जहाल आपल्या समाजबांधवांच्या न्याय हक्कासाठी झगडणारे आहे. तर गांधीजींचे व्यक्तिमत्त्व देशस्वातंत्र्याला जास्त महत्त्व देणारे आहे. अस्पृश्य निवारण हिंदू धर्मात राहूनच होऊ शकते अशी त्यांची भूमिका आहे आणि त्यासाठी ते आंबेडकरांना स्वतंत्र मतदार संघ व धर्मांतराला विरोध करताना दिसतात. अशा घटनाप्रसंगावरूनच त्यांच्यात संघर्ष निर्माण झाल्याचे दिसते. नाटकामध्ये ही दोन्ही व्यक्तीमत्त्वे दोन टोकाची दिसतात. वास्तव इतिहासातही ती तशीच होती त्याचप्रमाणे या नाटकातही त्यांची मांडणी तशीच करण्यात आली आहे. एका बाजूला गांधीजी हे प्रामुख्याने स्वातंत्र्याची मागणी

करीत असताना त्याचवेळी आंबेडकर हे स्वातंत्र्यापेक्षा अस्पृश्यतेच्या लढ्याला जास्त महत्त्व देताना दिसतात. या नाटकातील ही दोन्ही व्यक्तीमत्त्वे खूप जिद्दी, ध्येयनिष्ठ, संयमी आणि हुशार, विद्वत्ता प्राप्त केलेली अशी वाटतात. देशासाठी आणि अस्पृश्यांच्या परिवर्तनासाठी कार्यरत असणारी ही व्यक्तिमत्त्वे आहेत. लेखकांनी या नाटकातून मांडलेल्या या व्यक्तिरेखांच्या अंगी प्रामुख्याने आंबेडकरांच्या अंगी बंडखोर वृत्ती, विद्रोह अन्यायाबद्दल चिड, अस्पृश्यांविषयी तळमळ तसेच त्यांच्या विकासासाठी शिक्षणाविषयीची आवड आपल्या कामाप्रती एकनिष्ठता तसेच कुटुंबाची काळजी, समाजबांधवांची काळजी आणि आपल्या हक्कासाठी लढण्याची तयारी असे अनेक नेतृत्वाचे गुण दिसून येतात. त्याचप्रमाणे गांधीजींच्या अंगी जिद्द, चिकाटी, सत्यप्रियता, दैववादी, स्वातंत्र्याची धडपड, काँग्रेसची काळजी, अस्पृश्यता निर्मुलनाचा विचार, असे अनेक गुण त्यांच्या अंगी दिसून येतात. अंतर्मुखता, सावधपणा, जागणूकता हे गांधीजींच्या स्वभावाचे विशेषगुण आहेत. त्यांनी आयुष्यभर केलेल्या प्रयोगामधून त्यांच्या व्यक्तीमत्त्वाला आकार येत गेला असे दिसते. गांधींच्या जीवनात निष्क्रीयतेला आळशीपणाला बिलकुल थारा नव्हता. अशा सर्व सांस्कृतिक, धार्मिक, राजकीय, सामाजिक अंगानी बनलेले असे हे गांधीजींचे व्यक्तिमत्त्व आहे.

डॉ. आंबेडकरांच्या व्यक्तिमत्त्वाचा विचार करीत असताना, हजारो वर्षे अंधारात असणाऱ्या बहुसंख्य दलित समाजाला प्रथम धार्मिक, सांस्कृतिक, शैक्षणिक आणि राजकीय स्वातंत्र्य मिळाले पाहिजे, इथली अस्पृश्यता कायमची नष्ट झाली पाहिजे. म्हणून धर्मनिरपेक्षतेचे स्वप्न डॉ. बाबासाहेब पाहतात. एके ठिकाणी ते म्हणतात, 'दलितांच राजकारण, विशिष्ट जातीचं राजकारण; या बोचऱ्या शब्दाच्या धारदार पात्यानं मन कसं विदीर्ण होऊन गेलय, खरच मी का करतो दलितांच राजकारण? मला दुसरं काहीच जमत नाही म्हणून? गेली हजारो वर्षे अज्ञानाच्या खाईत होरपळत पडलेल्या या समाजाला नव्या जाणिवेची उभारी द्यायची असेल तर मला हे केलेच पाहिजे'[९] असे आंबेडकरांना वाटते. गांधीजींच्या संदर्भात विचार करीत असताना देशाला स्वातंत्र्य मिळाले पाहिजे पण त्यातली वर्णव्यवस्था कायमची राहिली पाहिजे असे म्हणणे गांधीजींना कोणतं राजकारण करतात ते म्हणतात, 'मी ब्राह्मणांचा सर्वनाश करून अब्राह्मणांना कदापी वर चढू देणार नाही.'[१०]

म्हणजे गांधीजी हे अब्राह्मणांच्या किंवा शुद्रांच्या हातात सत्ता द्यायला तयार नाहीत म्हणजे एका बाजूला धर्मनिरपेक्षता आणि दुसऱ्या बाजूला धर्मालाच चिकटून राहणे अशी ही गांधींची भूमीका नाटककाराने चित्रित केली आहे. यामध्ये प्रेमानंद गज्वींनी या व्यक्तिरेखांना साकार करीत असताना मनोविश्लेषणाची जोड दिलेली आहे. भालचंद्र फडके यांनीही गांधी-आंबेडकर ही व्यक्तिमत्त्वे इतिहासाला तटस्थ राहून त्यांच्यातील संघर्ष मांडण्याचा व त्यातून त्यांचे व्यक्तिमत्त्व चित्रित करण्याचा चांगला प्रयत्न केला आहे. नाटकातील व्यक्तिमत्त्वाचे  गुण आणि मुळ व्यक्तीमत्त्वातील गुण हे इतिहासाला तटस्थ राहून लिहल्यामुळे समान वाटतात. उदा.- आंबेडकर हे बंडखोर, विद्रोह असे होते तर गांधीजी मवाळ व्यक्तीमत्त्वाचे पण आत्मस्तुतीप्रिय होते. एके ठिकाणी ते म्हणतात, 'अस्पृश्यतेचे निर्मूलन आपण करू शकलो तर जगात आपली ख्याती होईल. अस्पृश्यते विरुद्ध चालविलेले युद्ध म्हणजे हिंदूधर्मातील अनिष्ठ रुढीविरुद्धचे अशुद्धते विरुद्धचे युद्ध आहे' वरील या विधानावरून गांधीजी आत्मस्तुती आवडणारी व्यक्ती होती हे लक्षात येते हा त्याचा गुण मूळ व्यक्तीमत्त्वात आहे तो नाटकातही दिसतो.

या दोन्ही नाटकातील गांधी-आंबेडकरांच्या व्यक्तीमत्त्वाचा अभ्यास करताना असा अनेक घटनाप्रसंगावरून गांधी-आंबेडकरांचे मूळ व्यक्तीमत्त्व आणि नाटकातील व्यक्तीमत्त्व याचा जवळचा संबंध दिसून येतो. थोड्याफार प्रमाणात त्यामध्ये साम्य आढळते. ऐतिहासिक कलाकृती ही लेखकाला तटस्थ राहूनच मांडावी लागते जरी त्या कलाकृती कल्पनेचा साज चढविला तरी मूळ तटस्थता, वातावरण, घटना प्रसंग यांना डावलता येत नाही हे ऐतिहासिक कलाकृतीच्या मांडणीवरून लक्षात येते. त्यामुळे मूळ व्यक्तीमत्त्व आणि नाटकातील व्यक्तीमत्त्व यामध्ये थोडाफार साम्यभेद जाणवणे साहजिक आहे.

## संदर्भ सूची :


म. गांधी -

| | | |
|---|---|---|
| १) | म. गांधी - | सत्याचे प्रयोग (आत्मकथा) पृ. ५ |
| २) | प्रसाद कुलकर्णी - | म. गांधी आणि गांधी वचने, पृ. २० |
| ३) | प्रसाद कुलकर्णी - | म. गांधी आणि गांधी वचने, पृ. २० |
| ४) | प्रसाद कुलकर्णी - | म. गांधी आणि गांधी वचने, पृ. २० |
| ५) | गं. बा. सरदार - | गांधी-आंबेडकर, सुगावा प्रकाशन, पुणे ३०, व्दितीय आवृत्ती , १९९०, पृ. ५१-५२. |
| ६) | गं. बा. सरदार - | गांधी-आंबेडकर, पृ. ५१. |
| ७) | गं. बा. सरदार - | गांधी-आंबेडकर, पृ. ५२. |
| ८) | गं. बा. सरदार - | गांधी-आंबेडकर, पृ. ५६. |
| ९) | गं. बा. सरदार - | गांधी-आंबेडकर, पृ. ८६. |

डॉ. आंबेडकर

| | | |
|---|---|---|
| १) | चां. र. खैरमोडे - | डॉ. भि. रा. आंबेडकर,खंड-१, पृ. ४३. |
| २) | भालचंद्र फडके - | आंबेडकर आणि दलित साहित्य प्रथम आवृत्ती-१९९९, पृ. ८० |
| ३) | डॉ. आंबेडकर - | माझी आत्मकथा, पृ. ५. |
| ४) | गं. बा. सरदार - | गांधी-आंबेडकर, पृ. ३३. |
| ५) | ज. गो. संत - | डॉ. आंबेडकर म्हणतात असा मी जगलो, पृ. ३९. |
| ६) | संपा. शरणकुमार लिंबाळे - | प्रज्ञासूर्य, प्रचार प्रकाशन, कोल्हापूर, प्र.आ. १९९१. पृ. १२८. |
| ७) | तत्रैव, | पृ. १२८. |
| ८) | गं. बा. सरदार - | गांधी-आंबेडकर, पृ. ९. |
| ९) | प्रेमानंद गज्वी - | गांधी-आंबेडकर (नाटक) पृ. ५१-५२. |
| १०) | तत्रैव, | पृ. ५२. |
| ११) | भालचंद्र फडके - | डॉ. आंबेडकर आणि गांधीजी (नाटक), पृ. ३६. |